# वॅनबरीची एकूण विक्री ३८८.५ कोटी

वॅनबरी लिमिटेड कंपनीने १८ महिन्यांच्या कालावधीत रु. ३८८.५ कोटी विक्री साध्य केली असून त्यावर रु. २९.८ कोटी करोत्तर नफा कमावला आहे. उतरलेल्या दराने माल विक्री झाल्यामुळे कंपनीच्या प्रचालन पातळीवरील मार्जिनमध्ये ३.९१ टक्के वाढ होऊ शकली आहे. तसेच एफसीसीबीमुळे होणारे विदेशी चलन नुकसान भरून काढण्यासाठी कंपनीने तरतूद केली आहे त्यामुळे मार्जिनमध्ये ३ टक्के घट झाली आहे. तसेच इतर उत्पन्नात घट झाल्यामुळे निव्वळ मार्जिनच्या प्रमाणातसुद्धा थोडी घट झाली आहे. त्याचप्रमाणे व्याज घसारा वाढल्यामुळे देखील निव्वळ मार्जिनमध्ये घट झाली आहे. वित्तीय वर्ष २००७ मध्ये प्रलंबित कर मालमत्तेमुळे (डेफर्ड टॅक्स असेट) करोत्तर नफ्यात म्हणजेच मार्जिनमध्ये ४ टक्के वाढ झाली होती.